RNI No. MAHBIL/2012/48433

www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - ६ ] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ५ - ११, २०२६ / माघ १६ - २२, शके १९४७ [ पृष्ठे-१९

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### जिल्हाधिकारी यांजकडून

### शुद्धिपत्रक

क्रमांक पीएलए/कावि/२२०४(१)/२०२६.—मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील रोशल गार्डन ते पांजरपोळपर्यंत जाणारा ६१ मी. रस्ता रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादनाबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ सह भूमी संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ६ अन्वयेची अधिसूचना क्र. पीएलबी-२/कावि-१०२/२००९, दिनांक २४ मार्च २००९ अन्वये निर्गत केली असून, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, ऑगस्ट २०, २००९ मध्ये पृष्ठे २७७३ ते २७७५ वर प्रसिद्ध झालेली आहे व दुरुस्त अधिसूचना क्र. पीएलबी-२/कावि/६५/२०२० अन्वये निर्गत केली असून, महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, नोव्हेंबर १२-१८, २०२० रोजी, पृष्ठे ११-१२ वर प्रसिद्ध झाली आहे. प्रसिद्ध अधिसूचनेत संपादनाखालील मिळकतींचे मालमत्ता पत्रिकेवर नगर भूमापन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांचेकडील क्र. ३५३६, न.भू.अ.पिंपरी-चिंचवड/प.भू.२/२०२५, दिनांक २८ ऑगस्ट २०१५ अन्वये संपादनाखालील मिळकतींचे मिळकत पत्रिकेवर क्षेत्र दाखल केले आहे. त्यामुळे सि.स. क्रमांकच्या मालमत्ता पत्रकावर क्षेत्र दुरुस्तीची आवश्यकता नाही, अशी दुरुस्ती शासन राजपत्रात उपरोक्त प्रसिद्ध अधिसूचनेत करण्यात येत आहे.

| याऐवजी | असे वाचावे |
|---|---|
| मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे. | मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे. |
| ब) ज्या सि.स.क्रमांकच्या मालमत्ता पत्रकावर क्षेत्र दुरुस्तीची आवश्यकता आहे, अशा संपादनाखालील मालमत्तांची अनुसूची. | अ) ज्या सि.स.क्रमांकच्या मालमत्ता पत्रकावर क्षेत्र दुरुस्तीची आवश्यकता नाही, अशा संपादनाखालील मालमत्तांची अनुसूची. |

**जितेंद्र डुडी,**

पुणे, १० जानेवारी २०२६. जिल्हाधिकारी, पुणे.

---

### शुद्धिपत्रक

क्रमांक पीएलए/कावि/२२०४(२)/२०२६.—मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील रोशल गार्डन ते पांजरपोळपर्यंत जाणारा ६१ मी. रस्ता रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादनाबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ सह भूमी संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ६ अन्वयेची अधिसूचना क्र. पीएलबी-२/कावि-१०२/२००९, दिनांक २४ मार्च २००९ अन्वये निर्गत केली असून, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, ऑगस्ट २०, २००९ मध्ये पृष्ठे २७७३ ते २७७५ वर प्रसिद्ध झालेली आहे व दुरुस्त अधिसूचना क्र. पीएलबी-२/कावि/६५/२०२० अन्वये निर्गत केली असून, महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग एक-पुणे

विभागीय पुरवणी, नोव्हेंबर १२-१८, २०२० रोजी पृष्ठे ११-१२ वर प्रसिद्ध झाली आहे. नगर भूमापन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांचेकडील क्र. ३५३६, न.भू.अ.पिंपरी- चिंचवड/प.भू.२/२०२५, दिनांक २८ ऑगस्ट २०२५ अन्वये सिटी सर्व्हे क्रमांक ४१०५ व ४१०६ हे नंबर ३९५३ सामील होऊन सामिलीकरण मो.र.नं. २२६/१० नुसार सि.स.नं. ३९५३ ते ४१०७ मध्ये सामील केलेले आहे. शासन राजपत्रात उपरोक्त प्रसिद्ध अधिसूचनेत संपादनातून वगळावयाचे सिटी सर्व्हे क्रमांक व त्यांचे क्षेत्र अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

**याऐवजी**

**मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | सिटी सर्व्हे क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) | दिशा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | ११२ पै. | ४१०५ पै. | १३६.९२ | अस्तित्वातील रस्त्याच्या पश्चिमेकडील |
| २. | ११२ पै. | ४१०६ पै. | ३३५.२९ | अस्तित्वातील रस्त्याच्या पश्चिमेकडील |

**असे वाचावे**

**मौजे भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | नगर भूमापन क्रमांक | संपादनातून वगळण्यात आलेले नगर भूमापन क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र चौ.मी | संपादनातून वगळण्यात आलेल्या जागेचे अंदाजे क्षेत्र चौ.मी. | दिशा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | ११२ पै. | -- | ४१०५ पै. | -- | १३६.९२ | अस्तित्वातील रस्त्याच्या पश्चिमेकडील |
| २. | ११२ पै. | -- | ४१०६ पै. | -- | ३३५.२९ | अस्तित्वातील रस्त्याच्या पश्चिमेकडील |

**जितेंद्र डुडी,**

पुणे, १० जानेवारी २०२६.

जिल्हाधिकारी, पुणे.

---

**संचालक, नगर रचना यांजकडून**

**शुद्धिपत्रक**

क्रमांक डी.टी.पी./वि.यो.लोणावळा(दु.सु.)/या.क्र.१०४६६/२०१९/आ.क्र.२६,"शॉपिंग सेंटर"/कलम-१२७ *(२)*/आदेश/शुद्धिपत्रक/टीपीव्ही-१/९७/२०२६.—नगर रचना संचालनालयाने निर्गमित केलेल्या अधिसूचना क्र. डी.टी.पी./वि.यो.लोणावळा(दु.सु.)/या.क्र.१०४६६/२०१९/आ.क्र.२६, "शॉपिंग सेंटर"/कलम-१२७ *(२)*/आदेश/टीपीव्ही-१/६५५५, दिनांक १३ डिसेंबर २०२५ या मराठी व इंग्रजी अधिसूचनेतील परिच्छेद क्रमांक २ (दोन), परिच्छेद क्रमांक ४ (चार), तसेच परिशिष्टामधील रकाना क्रमांक ४ (चार) येथे पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे :--

**मराठी**

| **अ.क्र.** | **याऐवजी** | **असे वाचावे** |
|---|---|---|
| १. | आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर व अंतिम विकास योजनेमध्ये, 'एच' वॉर्ड येथील सि.स.नं. २९/२ (स.नं. १२०/२), भूखंड क्र. १ व २ या जमिनींचे क्षेत्र आरक्षण क्रमांक २६, "शॉपिंग सेंटर" या आरक्षणाने..... | आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर व अंतिम विकास योजनेमध्ये, 'एच' वॉर्ड येथील सि.स.नं. २९/१ व २९/२ (स.नं. १२०/२), भूखंड क्र. १ व २ या जमिनींचे क्षेत्र आरक्षण क्रमांक २६, "शॉपिंग सेंटर" या आरक्षणाने.... |
| २. | आणि ज्याअर्थी, 'एच' वॉर्ड येथील सि.स.नं. २९/२ (स.नं. १२०/२), भूखंड क्र. १ या जमिनीचे उक्त आरक्षणाने..... | आणि ज्याअर्थी, 'एच' वॉर्ड येथील सि.स.नं. २९/१ (स.नं. १२०/२), भूखंड क्र. १ या जमिनीचे उक्त आरक्षणाने..... |
| ३. | परिशिष्टातील रकाना क्र. ४, सि.स.नं. २९/२ (स.नं. १२०/२), भू. क्र. १ | परिशिष्टातील रकाना क्र. ४, सि.स.नं. २९/१ (स.नं. १२०/२), भू. क्र. १. |

इंग्रजी

| Sr. No. | For | Read as |
|---|---|---|
| 1. | And whereas, in the said Sanctioned and Final Development Plan, the area of the lands bearing C.T.S. No. 29/2 (S.No. 120/2), Plot Nos. 1 and 2 of 'H' Ward is affected by reservation Site No. 26 "Shopping Center"..... | And whereas, in the said Sanctioned and Final Development Plan, the area of the lands bearing C.T.S. Nos. 29/1 and 29/2 (S.No. 120/2), Plot Nos. 1 and 2 of 'H' Ward is affected by reservation Site No. 26, "Shopping Center"...... |
| 2. | And whereas, the concerned land owners (hereinafter referred to as "the said Land Owner") of the land bearing C.T.S. No. 29/2 (S.No. 120/2), Plot No.1 of 'H' Ward, for the area admeasuring approximately 1033.40 sq.mtrs. which is affected by the said Resarvation...... | And whereas, the concerned land owners (hereinafter referred to as "the said Land Owner") of the land bearing C.T.S. No. 29/1 (S.No. 120/2), Plot No. 1 of 'H' ward, for the area admeasuring approximately 1033.40 sq.mtrs. which is affected by the said Resarvation...... |
| 3. | In the Coloumn No. 4 of the Schedule C.T.S. No. 29/2 (S.No. 120/2) Plot No. 1. | In the Coloumn No. 4 of the Schedule C.T.S. No. 29/1 (S.No.120/2), Plot No. 1. |

उक्त अधिसूचनेमधील उर्वरित तपशीलामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**जितेंद्र ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, ६ जानेवारी २०२६.

---

## उपविभागीय अधिकारी यांजकडून

### शुद्धिपत्रक

क्रमांक उविअ, पुणे उपविभाग, पुणे/एसआर-२०/कावि-१४/दुरुस्ती/२०२६.—ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे यांची महाराष्ट्र औद्योगिक विभाग अधिनियम, १९६१ चे कलम ३२, ३५, उपकलम २ व ३ अन्वये जिल्हा पुणे, तालुका शिरूर, मौजे करडे येथील जमिनी संपादन करणेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणीमध्ये गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर ९-१५, २०२५ रोजी पृष्ठे १८-१९ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत येत आहे.

**अनुसूची**

**याऐवजी**

| गट नंबर | प्रकरण ६ लागू क्षेत्र (हे.आर) | गट क्रमांक | महामंडळास आवश्यक क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ७/१ | १.८८ | ७७ पै. | ०.०५ |

**असे वाचावे**

| गट नंबर | प्रकरण ६ लागू क्षेत्र (हे.आर) | गट क्रमांक | महामंडळास आवश्यक क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ७७/१ | १.८८ | ७७ पै. | ०.०५ |

**विठ्ठल जोशी,**
उपविभागीय अधिकारी,
पुणे उपविभाग, पुणे.

पुणे, ९ जानेवारी २०२६.

---

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे**

*महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क अन्वये अंतिम आदेश*

**झोपडपट्टी पुनवर्सन अंतिम आदेश**

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-३/झोपुआ/२९८८/२०२५.—ज्याअर्थी, गट नंबर १३३३, १३३४, १३५९, १३६७, १३९९, १४००/१, १४०१, १४१३, १४१४, १४१५, १४१६, १४१७, १४१९, १४२३, १४२४, १४२५, १४३०, १४४५/१, १४४६, मोरे वस्ती, भीमशक्तीनगर, चिखली येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करून महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, डिसेंबर ५-११, २०२४ मध्ये पृष्ठे ११-१२ वर, तसेच स्थानिक दैनिक वृत्तपत्रात दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे, तसेच सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा पद्धतीने संबंधित झोपडपट्टीमध्ये प्रत्यक्ष जागेवर दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत ही शासकीय मालकीची असून दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी पूर्वसूचना आदेश प्रसिद्ध करतेवेळी विकसक यांनी सदर मिळकतीचा मोजणी नकाशा सादर केला नव्हता व अंतिम ३ *(क)* आदेश पारित करणेपूर्वी मोजणी नकाशा सादर करणेच्या अटीवर झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कलम ३ *(क)* पूर्वसूचना प्रसिद्ध करणेत आलेली होती. याबाबत, विकसक यांनी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांचेकडील दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजीचा मोजणी नकाशा या विभागास सादर केलेला आहे. सदर मोजणी नकाशावरून अनुसूचीमध्ये नमूद मिळकतीचे क्षेत्र ३४०००.०० चौ.मी. इतके असलेचे दिसून येते. त्यानुसार प्राथमिक ३ *(क)* आदेशामध्ये याबाबत दुरुस्ती करून अंतिम ३ *(क)* प्रसिद्ध करणे आवश्यक वाटते. त्यामुळे कलम ३ *(क)* पूर्वसूचना आदेशामधील नमूद क्षेत्राऐवजी ३४०००.०० चौ. मी. एवढे क्षेत्र नमूद करून व मोजणी नकाशानुसार चतु:सीमा नमूद करून अंतिम ३ *(क)* आदेशामध्ये तसा बदल करणे क्रम प्राप्त आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागामालक, पुणे महानगरपालिका यांनादेखील देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागामालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते आणि सदरची पूर्वसूचना प्रसिद्ध करणेत येऊन ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला असून अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे जमीनमालक अथवा इतर कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत / तक्रार प्राप्त झालेली नाही.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश :--**

(१) सदर "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्यासंदर्भातील दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर नोटिसीद्वारे प्रसारित केलेली पूर्वसूचना कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झालेपासून सदरच्या आदेशाविरोधात ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

## अनुसूची

**महानगरपालिका क्षेत्र :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

**झोपडपट्टीचे नाव** : गट नंबर १३३३, १३३४, १३५९, १३६७, १३९९, १४००/१, १४०१, १४१३, १४१४, १४१५, १४१६, १४१७, १४१९, १४२३, १४२४, १४२५, १४३०, १४४५/१, १४४६, मोरे वस्ती, भीमशक्तीनगर, चिखली, जिल्हा पुणे.

### गाव चिखली

| सर्व्हे नंबर / सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र. | जमीन / भोगवटादाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमितीय पद्धतीने) | योजना क्षेत्राची चतु:सीमा (कॅडेस्ट्रिअल नकाशानुसार) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| गट नंबर १३३३, १३३४, १३५९, १३६७, १३९९, १४००/१, १४०१, १४१३, १४१४, १४१५, १४१६, १४१७, १४१९, १४२३, १४२४, १४२५, १४३०, १४४५/१, १४४६. | पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण. | ३४०००.०० चौ.मी. | गट नं. १३९९ पै. (न.भू.क्र. ३० पै.), १३६७ पै. (न.भू.क्र. ३६ पै.), १३५९ पै. (न.भू.क्र. ३७ पै.), १३३४ पै. (न.भू.क्र. ३८पै.), १३३३ पै. (न.भू.क्र. ३९). | गट नं. १४३० पै. (न.भू.क्र. १५ पै.), १४२३ पै. (न.भू.क्र.१८ पै.), १४१९ पै. (न.भू.क्र. २२ पै.), १४१७ पै. (न.भू.क्र. २३ पै.), १४१६ पै. (न.भू.क्र. २४ पै.), १४१५ पै. (न.भू.क्र. २५ पै.), १४१४ पै. (न.भू.क्र. २६ पै.), १४१३ पै. (न.भू.क्र. २७ पै.), १४०१ पै. (न.भू.क्र. २८ पै.), १४०० पै. (न.भू.क्र. २९ पै.), १३९९ पै. (न.भू.क्र. ३० पै.), रस्ता. | गट नं. १४४६ पै. (न.भू.क्र. १२ पै.), १४४५ पै. (न.भू.क्र. १३ पै.), | गट नं. १४४५ पै. (न.भू.क्र. १३ पै.), १४३० पै. (न.भू.क्र. १५ पै.), १४२५ पै. (न.भू.क्र. १६ पै.), १४१९ पै. (न.भू.क्र. २२ पै.), १४१७ पै. (न.भू.क्र. २३ पै.), १४१५ पै. (न.भू.क्र. २५ पै.), १४१४ पै. (न.भू.क्र. २६ पै.), १४१३ पै. (न.भू.क्र. २७ पै.), १४०१ पै. (न.भू.क्र. २८ पै.), १४०० पै. (न.भू.क्र. २९ पै.), १३९९ पै. (न.भू.क्र. ३० पै.), १३६७ पै. (न.भू.क्र. ३६ पै.) व रस्ता. |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**सतीशकुमार खडके** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, ८ डिसेंबर २०२५.

*महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ड) सह १२ अंतर्गत*

## झोपडपट्टी निर्मूलन आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-२/५२६५/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता "उपरोक्त अधिनियम" असा करणेत येत आहे) चे कलम ३-अ *(१) (२)* अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्रमांक झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१, दिनांक ३० जून २००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये फा.प्लॉ.नं. ८२२ पै., भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे ८४२.९३ चौ.मी. या क्षेत्रावर (प्रस्तुत आदेशात या मिळकतीचा उल्लेख यापुढे "सदर क्षेत्र" असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. आकांक्षा कन्स्ट्रक्शन यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्र दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३-क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर २०-२६, २०२५, पृष्ठे ४५-४६ मध्ये प्रसिद्ध करणेत आला आहे, तसेच दैनिक दायित्व या दैनिक वर्तमानपत्रामध्ये दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करणेत आलेले असून सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी डकविण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर प्रस्तावास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेकडील नियमावली, २०२२ यातील नियम क्र. ४ *(५)* च्या तरतुदीनुसार दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर मिळकतीवरील झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी तयार करणेत आलेली आहे. सदर मिळकतीवरील निश्चित करण्यात आलेल्या अंतिम पात्रता यादीनुसार एकूण ३९ झोपडीधारक असून त्यापैकी निवासी पात्र ३१, अपात्र २ व इतर ६ याप्रमाणे असा समावेश आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त झोपडपट्टी पुनर्वसन आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(ड)* अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे ;

आणि ज्याअर्थी, विकसक मे. आकांक्षा कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत उपरोक्त मिळकतीवर राहणाऱ्या सर्व झोपडीधारकांची तात्पुरत्या स्वरूपात राहण्याची व्यवस्था भाडे करार करून करणार असलेबाबतचे रुपये ५०० च्या मुद्रांकावरील दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजीचे प्रतिज्ञापत्र विकसक यांनी या कार्यालयाकडे दाखल केलेले आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतुदींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पडणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, सतीशकुमार खडके (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३-ड, सहकलम १२ *(१)* नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

**आदेश :--**

१) खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे "झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र" म्हणून घोषित करत आहे.

२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकाम यामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(१)* अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसकाच्या ताब्यात द्यावी.

३) अशा रीतीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(१)* अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसांचे आत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तत्काळ स्थलांतरित व्हावे.

४) उक्त अधिनियमाच्या कलम १२ *(८)* अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे, तसेच इमारतीतील सामानांची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यांस राहतील.

५) कोणत्याही झोपडीधारकाने विहित मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३-झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

७) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड, सहकलम १२ *(४)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१ यांचे कार्यालयात अपील दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**महानगरपालिका क्षेत्र :** पुणे महानगरपालिका.

**झोपडपट्टीचे नाव :** फा.प्लॉ.नं. ८२२ पै., भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे.

**गाव भांबुर्डा, पुणे**

| सर्व्हे नंबर / सि.स.नं. / फा.प्लॉट क्र. | जमीन / भोगवटादाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | योजना क्षेत्राची चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| फा.प्लॉ.क्र. ८२२ पै. | पुणे महानगरपालिका | ८४२.९३ चौ.मी. | फा.प्लॉ.क्र. ८२२ पै. | फा.प्लॉ.क्र. ८२२ पै. | लागू रस्ता | फा.प्लॉ.क्र. ८२० व फा.प्लॉ.क्र. ८१९. |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**सतीशकुमार खडके** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, ११ डिसेंबर २०२५.

---

*महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३-क अन्वये*

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-२/५२७४/२०२५.—ज्याअर्थी, सि.स.नं. ८९९, ९०० (सर्व्हे नं. १२०/२९/अ-१+अ-२) जय भवानीनगर, गोगो प्लॉट, कोथरूड, पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करून दैनिक वृत्तपत्रात दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागामालक / विकसक यांना व एक प्रत मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना देण्यात आली आहे आणि उक्त पूर्वसूचनेद्वारे जागामालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्मावण्यात आले होते. प्राप्त हरकत / आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने हरकतदार व योजनेचे विकसक यांची उक्त अधिनियमातील

तरतुदीअन्वये सुनावणी घेऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आणि सुनावणीअंती दोन्ही उभय पक्षकार यांचे तोंडी युक्तिवाद विचारात घेऊन त्याबाबतचे स्वतंत्र निकालपत्र पारित करण्यात आले असून हरकतदार यांचा हरकत / आक्षेप अर्ज दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आले आहेत.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश :--**

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्यासंदर्भातील दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजीची जाहीर नोटिस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना) कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

**अनुसूची**

**महानगरपालिका क्षेत्र** : पुणे महानगरपालिका.

**झोपडपट्टीचे नाव** : सि.स.नं. ८९९, ९०० (सर्व्हे नंबर १२०/२९/अ-१+अ-२) जय भवानीनगर, गोगो प्लॉट, कोथरूड, पुणे.

**गाव कोथरूड, पुणे**

| सर्व्हे नंबर / सि.स.नं. / फा.प्लॉट क्र. | जमीन / भोगवटादाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | योजना क्षेत्राची चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं. ८९९, ९०० (सर्व्हे नं. १२०/ २९/अ-१+अ-२). | खाजगी | २००२.७३ चौ.मी. | लागू रस्ता | लागू रस्ता | लागू न.भू.क्र. ९०१ व लागू न.भू.क्र. ९०२. | लागू रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**सतीशकुमार खडके** (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १२ डिसेंबर २०२५.

**मुख्याधिकारी यांजकडून**

**फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद, तालुका हवेली, जिल्हा पुणे**

**अधिसूचना**

क्रमांक फु.उ.दे.न.प./कार्या.-१/३७८७/२०२६.— महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता, तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५, दिनांक २८ एप्रिल २०१५ रोजी लागू करणेत आला आहे.

फुरसुंगी-उरुळी देवाची नगर परिषद क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे लोकसेवा अधिसूचित करण्यात येत आहे, तसेच त्याची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी, अंतिम अपिलीय अधिकारी यांची माहिती महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३ अन्वये खालीलप्रमाणे अधिसूचित करून जाहीर प्रगटन करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५**

**कलम ३ अन्वये नगरपालिके (ब-वर्ग) ने जाहीर करावयाच्या लोकसेवेचा तपशील**

**परिशिष्ट**

| अ.क्र. | लोकसेवा सूची | आवश्यक कागदपत्रे | विहित फी | विहित कालावधी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | जन्म प्रमाणपत्र देणे. / To Issue Birth Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | जन्म, मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी तथा विभाग प्रमुख, जन्म-मृत्यू विभाग. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २. | मृत्यू प्रमाणपत्र देणे. / To Issue Death Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | जन्म, मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी तथा विभाग प्रमुख, जन्म-मृत्यू विभाग. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे. / To Issue Marriage Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज | महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन व विवाह नोंदणी अधिनियम, १९९८ नुसार. | ३६ दिवस. | मुख्याधिकारी | निबंधक विवाह मंडळ व विवाह नोंदणी (राज्यस्तरीय), पुणे, तथा संचालक (२), आरोग्य सेवा, पुणे. | आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान. |
| ४. | झोन दाखला (मंजूर विकास योजनेतील एका सर्व्हे नंबर / गट नंबरसाठी) / To Issue Zone Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. ७/१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा, ३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | विभाग प्रमुख, नगर रचना विभाग. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | भाग नकाशा देणे. / 20 cm. × 30 cm. (A-4 Size) To Issue Part Map. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. ७/१२ उतारा / सिटी सर्व्हे उतारा, ३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | विभाग प्रमुख, नगर रचना विभाग. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६. | बांधकाम परवाना देणे. / To Issue Building Permission. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. वास्तूविशारदाचा दाखला, ३. मालकी हक्काची कागदपत्रे, ४. बांधकाम आराखडा नकाशा (नकाशा ५ प्रती), ५. मोजणी नकाशा, ६. मंजूर रेखांकनाची प्रत (ऑनलाईन पद्धतीने). | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ६० दिवस | विभाग प्रमुख, नगर रचना विभाग. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ७. | जोते प्रमाणपत्र देणे. / To Issue Plinth Completion Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | विभाग प्रमुख, नगर रचना विभाग. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ८. | भोगवटा प्रमाणपत्र देणे. / To Issue Occupancy Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र, ३. जोते प्रमाणपत्र, ४. घर मालक / वास्तूविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | २१ दिवस | विभाग प्रमुख, नगर रचना विभाग. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ९. | नवीन व्यवसाय परवाना मिळणे. / Getting New License. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज, २. ओळखपत्र, ३. भाडेकरारनामा / वैध भोगवटा प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १०. | परवान्याचे नूतनीकरण करणे. / Renewal of License. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ११. | परवाना हस्तांतरण / Transfer of License. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

परिशिष्ट--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | परवाना दुय्यम प्रत / Duplicate Copy of License. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १३. | व्यवसायाचे नाव बदलणे. / Change in Name of Business. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १४. | व्यवसाय बदलणे. / Change the Business. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १५. | परवाना/भागीदाराचे नाव बदलणे. / Change the Business Holder / Partner. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १६. | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ / कमी)./ Change Number of Partners (In-crease / Decrease). | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १७. | परवाना रद्द करणे. / Cancellation of License. | १. योग्यप्रकारे भरलेला अर्ज | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १८. | कालबाह्य परवाना-साठी नूतनीकरण सूचना. / Notice for Renewal of Expired License. | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १९. | व्यवसाय परवाना स्वयंनूतनीकरण (Auto Renewal of Trade License). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०. | मोबाईल टॉवर परवाना. / Mobile Tower Permission. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना,<br>३. संबंधित इमारतीच्या मालकीहक्काचा पुरावा,<br>४. वैध भाडेकरारनामा,<br>५. स्थळाचा नकाशा (१:१०००),<br>६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचे वैध भोगवटा प्रमाणपत्र,<br>७. संबंधित इमारतीच्या / जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र,<br>८. सक्षम प्राधिकाऱ्याचा अग्निशमन ना-हरकत दाखला,<br>९. सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र,<br>१०. पर्यावरण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र.<br>११. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र.<br>१२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने / दस्तऐवज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ६० दिवस. | बांधकाम अभियंता, विभाग प्रमुख. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २१. | नळजोडणी देणे. / To Issue New Water Connection. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. जागामालकी कागदपत्रे,<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २२. | मालकी हक्कात बदल करणे. / To Change Ownership Rights. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. जागा मालकी हक्क कागदपत्रे,<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २३. | नळजोडणी आकारामध्ये बदल करणे. / To Change Size of Water Connection. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४. | तात्पुरते / कायम-स्वरूपी नळजोडणी खंडित करणे. / To Disconnect Temporary / Permanent Water Connection. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २५. | पुन:जोडणी करणे. / Reconnect the Connection. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २६ | वापरामध्ये बदल करणे. / Change in use. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २७. | पाणीदेयक तयार करणे. / To Prepare Water Bill. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २८. | प्लंबर परवाना / Plumber License. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र. ३. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २९. | प्लंबर परवाना नूतनीकरण करणे. / Renewal of Plumber License. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र. ३. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३०. | नादुरुस्त मीटर तक्रार करणे. / To Complaint about faulty Meter. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३१. | अनधिकृत नळजोडणी तक्रार करणे. / Unauthorized Water Connection. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२. | पाण्याची दबाव क्षमता तक्रार करणे. / Complaint about Water Pressure. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३३. | पाण्याची गुणवत्ता तक्रार करणे. / Complaint about Quality of Water. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३४. | पाणी उपसा करण्यासाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग अथवा इतर संबंधित विभाग यांचे ना-हरकत प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे. / To Issue Certificate of non-availability of water from water supply agency required for NOC for water abstraction from Cetral Ground Water Authority / Relevant Authority). | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसलेचे प्रमाणपत्र,<br>३. ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जल पुनर्भरण करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र,<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३५. | थकबाकी नसल्याचा दाखला देणे. / No Dues Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३६ | जलनिस्सारण जोडणी देणे. / To Issue Drainage /Sewer Connection. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. जागामालकी कागदपत्रे,<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३७. | राज्य खाद्य परवान्या-करिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना-हरकत दाखला देणे. / NOC of Municipality for State License of Food Business. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसलेचे प्रमाणपत्र, ३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाने आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि मालकी हक्काबाबतची कागदपत्रे. ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३८. | राज्याच्या खाद्य नोंदणी प्रमाण-पत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा आरोग्य-विषयक ना-हरकत दाखला देणे. / Health NOC of Municipality for State License of Food Business. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र, ३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाने आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र व मालकी हक्काबाबतची कागदपत्रे. ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३९. | नव्याने कर आकारणी. / New Tax Assessment. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. भोगवटा प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४०. | पुन: कर आकारणी. / Re-Assessment of Tax. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४१. | कराची मागणीपत्र तयार करणे. / To Prepare Tax Demand Notice. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४२. | कर माफी मिळणे. / To get Tax Exemption. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३. | थकबाकी नसलेचा दाखला. / To Issue No Dues Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४४. | मालमत्ता कर उतारा देणे. / To Issue Extract of Property Tax. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४५. | (अ) दस्तऐवजांच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र,<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदीखत / बक्षीसपत्र / वाटणीपत्र व इतर). | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| | (ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. / To Issue Certificate of Transfer of Property. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र,<br>३. वारसा हक्क प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४६. | स्वयंमूल्यांकन. / Self-Valuation. | १. विहित नमुन्यातील अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४७. | आक्षेप नोंदविणे. / To Record Objection. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४८. | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन. / Division of Property in Sub-Division. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र,<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदीखत, वाटणीपत्र, बक्षीसपत्र इत्यादी). | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९. | मालमत्ता पाडणे व पुन:बांधणी कर आकारणी. / Tax Assessment on Demolishing and Re-construction of the Property. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५० | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे. / To get exemption from Tax to the Unoccupied Properties. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस | कर निरीक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५१. | रस्ता खोदाई परवाना देणे. / To Grant Road Cutting Permission. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र,<br>३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस. | नगर अभियंता (स्थापत्य) | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५२. | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. / Mandap NOC. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. रस्ता पुर्नस्थापना करार. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | मालमत्ता पर्यवेक्षक / जागा भाडे विभाग प्रमुख. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५३. | जाहिरात परवाना / आकाशचिन्ह परवाना व नूतनीकरण. / Advertisement / Sky Signange License, New License and Renewal. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस. | मालमत्ता पर्यवेक्षक / जागा भाडे विभाग प्रमुख. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५४. | व्यापार / व्यवसाय / साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे. / Trade NOC. | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५५. | सिनेमा चित्रीकरण परवाना, नवीन परवाना व नूतनीकरण. / Movie Shooting License, New License and Renewal. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १५ दिवस. | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५६ | लॉजिंग हाउस परवाना देणे. / Licensing of Lodging Houses. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५७ | लॉजिंग हाउस परवान्याचे नूतनीकरण करणे. / Renewal of Lodging House License. | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज, २. शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५८. | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवाना देणे. / Licensing of Office / Auditorium etc. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५९. | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवान्याचे नूतनी-करण करणे. Renewal of License of Office Auditorium etc. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६०. | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे. / Issuance of Hawker Regitra-tion Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६१. | भूमिगत दूरसंचार वाहिनी (ऑप्टिकल फायबर केबल) टाकण्याकरिता परवानगी देणे. / (Permission for establishment of underground Cable infrastruc-ture (Optical Fibre Cable). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/ सीआर-२४२/UD-२०, दि. १९ डिसेंबर २०२२ मधील Schedule III नुसार आवश्यक कागदपत्रे, ३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ६० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय दूरसंचार समिती. | प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग व अध्यक्ष, राज्यस्तरीय दूरसंचार समिती. |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६२. | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५, कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्षतोड परवानगी देणे. Permitting felling of Trees in accordance with the provisions of Section 8 of the Maharashtra (Urban Area) Tree Protection and Conservation Act, 1975. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ४५ दिवस | नियोजन प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी | नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी | नियोजन प्राधिकरणा-कडील वृक्ष प्राधिकरण |
| ६३. | रस्त्यावरील खड्डे बुजविणे. Filling Potholes on Roads. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६४. | गटारावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे. / Keeping Drain Cover in Good Condition. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | ५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६५. | शहरात स्वच्छता ठेवणे. / Keeping the City Clean. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | शासनाने अथवा नगरपरिषदेने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क. | १ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

तृतीय व अंतिम अपील राज्य आयुक्त, लोकसेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे यांचेकडे करता येईल. आयोगाच्या कार्यालयाचा ई-मेल आयडी व दूरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहे.

ई-मेल :-- coud.fursungiurulid@maharashtra.gov.in

दूरध्वनी :-- 9975696890

संकेतस्थळ :-- http://aaplesarkar.mahaonline.gov.in

**प्रसाद शिंगटे,**

मुख्याधिकारी,

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद,

फुरसुंगी-उरुळी देवाची.

फुरसुंगी-उरुळी देवाची, २७ जानेवारी २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI–400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.